महाराष्ट्र अॅक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

सत्यमेव जयते

No. MCA/ All Institutes/ Acupuncturists/Acupuncture Day / 770 /2025 Date-13/11/2025

To,
1. All Principals,
Recognized Acupuncture Diploma Course Institutions,
2. All Acupuncture professionals
State of Maharashtra.

**Subject: Regarding celebration of 16th November as 'Acupuncture Awareness Day'**

The Government of Maharashtra enacted the Maharashtra Acupuncture Therapy System Act, 2015 and established the Maharashtra Acupuncture Council. As per the provisions of the Act, the Council has completed the registration of existing Acupuncture practitioners in the State, as well as started Acupuncture Diploma courses in various recognized institutions in the state.

Acupuncture therapy is widely practiced in many countries. Also, **16th November** is celebrated globally as **'Acupuncture Awareness Day'.**

In this context, to create widespread public awareness about Acupuncture therapy and to ensure that information regarding the Diploma course initiated by the Government of Maharashtra through the Council reaches the general public, 12th-standard students, and their parents, it is essential to observe **16th November** every year as '**Acupuncture Awareness Day**'.

On this occasion —

1. Ensure that the therapeutic benefits of Acupuncture for various health conditions will reach the people.
2. Recognized Acupuncture Diploma colleges, Council-approved training centres, and private practitioners should organize community-based Acupuncture camps, workshops, demonstrations, and patient-awareness programmes.
3. Active participation of students, experts, and institutions will promote academic and professional development.
4. Public confidence will be strengthened in Acupuncture as a recognized and regulated healthcare system.
5. Experts will get an excellent platform to showcase their skills, research, and contributions to healthcare.
6. The professional image, reputation, and social acceptance of Acupuncture practitioners will be further enhanced.

Accordingly, all recognized Acupuncture institutions, Diploma colleges, and Acupuncture professionals in the State should observe 'Acupuncture Awareness Day' by organizing various programmes at the local level on 16th November (or between **17th to 22nd November** since 16th November falls on a Sunday). Details of the programmes conducted should be submitted to the Council by 25th November.

Thank you.

Yours Faithfully

(Narayan D. Nawale)
Registrar
Maharashtra Council of Acupuncture, Mumbai

महाराष्ट्र ॲक्युपंक्चर परिषद, मुंबई
Maharashtra Council of Acupuncture
202, 2nd Floor, Administrative/ Superintendent office Bldg,
Cama and Albless Hospital, Mahapalika Marg, Mumbai 400 001
Tel. : 022-22620376 | Email : mahacucouncil@gmail.com | Web : www.mahacucouncil.org

जा.क्र.मअॅप/ ॲक्यू. संस्था/ॲक्यू.व्यवसायीक/ ॲक्यूपंक्चर दिवस/ ७७० /२०२५ दिनांक: १३/ ११ / २०२५

**प्रति,**
१. सर्व प्राचार्य,
मान्यता प्राप्त ॲक्यूपंक्चर पदविका अभ्यासक्रम संस्था
२. सर्व ॲक्यूपंक्चर व्यावसायिक.
महाराष्ट्र राज्य

**विषय : दिनांक १६ नोव्हेंबर -ॲक्यूपंक्चर जनजागृती दिन म्हणून साजरा करण्याबाबत**

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अधिनियम, २०१५ जाहीर करून महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद स्थापन केली आहे. अधिनियमातील तरतुदीनुसार राज्यातील विद्यमान ॲक्यूपंक्चर तज्ज्ञांची नोंदणी पूर्ण करण्यात आली असून विविध मान्यता प्राप्त संस्थांमध्ये ॲक्यूपंक्चर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत.

ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धती अनेक देशांमध्ये व्यापकपणे प्रचलित आहे. तसेच **१६ नोव्हेंबर** हा दिवस जागतिक स्तरावर -**ॲक्यूपंक्चर अवेअरनेस डे** म्हणून साजरा केला जातो.

या अनुषंगाने ॲक्यूपंक्चर चिकित्सा पद्धतीबद्दल सर्वसामान्यांमध्ये व्यापक जनजागृती करणे, तसेच महाराष्ट्र शासनामार्फत परिषदेच्या माध्यमातून सुरू झालेल्या पदविका अभ्यासक्रमाबाबतची माहिती सर्वसामान्य नागरिक, १२वीतील विद्यार्थी व त्यांच्या पालकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे दरवर्षी **१६ नोव्हेंबर** हा दिवस **-ॲक्यूपंक्चर जनजागृती दिन** म्हणून साजरा करणे अत्यावश्यक आहे.

ॲक्यूपंक्चर जागृती कार्यक्रमाद्वारे–
१. विविध व्याधींवरील ॲक्यूपंक्चर उपचारांचे फायदे लोकांपर्यंत पोहोचतील याची काळजी घ्यावी.
२. मान्यता प्राप्त ॲक्यूपंक्चर पदविका महाविद्यालये, परिषद मान्यताप्राप्त प्रशिक्षण केंद्रे तसेच खाजगी ॲक्यूपंक्चर तज्ज्ञांनी समाजाभिमुख ॲक्यूपंक्चर शिबिरे, कार्यशाळा, प्रात्यक्षिके व रुग्ण-जागृती कार्यक्रमांचे आयोजन करावे.
३. विद्यार्थी, तज्ज्ञ व संस्थांचा सक्रीय सहभाग शैक्षणिक व व्यावसायिक उन्नतीस हातभार लावेल.
४. ॲक्यूपंक्चर ही अधिकृत व नियमनाधीन आरोग्य प्रणाली म्हणून सार्वजनिक विश्वास अधिक दृढ होईल.
५.तज्ज्ञांना त्यांच्या कौशल्याचे, संशोधनाचे आणि आरोग्य क्षेत्रातील योगदानाचे दर्शन घडविण्यास उत्कृष्ट व्यासपीठ मिळेल.
६. ॲक्यूपंक्चर व्यवसायाची व्यावसायिक प्रतिमा, प्रतिष्ठा आणि सामाजिक स्वीकृती अधिक वृद्धिंगत होईल.

वरीलप्रमाणे, राज्यातील सर्व मान्यता प्राप्त ॲक्यूपंक्चर पदविका संस्था व ॲक्यूपंक्चर व्यावसायिक यांनी १६ नोव्हेंबर रोजी (किंवा यावर्षी १६ नोव्हेंबर हा रविवार आल्यामुळे **१७ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत**) स्थानिक पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित करून -ॲक्यूपंक्चर जनजागृती दिन साजरा करावा. आयोजित कार्यक्रमांचा अहवाल दिनांक २५ नोव्हेंबरपर्यंत परिषदेकरिता सादर करावा.

धन्यवाद.

आपला स्नेहांकित,

नारायण डो. नवले
महाराष्ट्र ॲक्यूपंक्चर परिषद, मुंबई